## नि.क्र.१७ वरील आदेश

. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी त्यांना दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये दाखल केलेला असून अर्जानुसार अर्जदार यांचे कथन असे आहे की, प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द त्यांनी वादी यांना मालक म्हणून घोषित करण्याकरीता, प्रतिवादींनी वाद मिळकतीबाबत अडी–अडथळा करु नये, तसेच नियमित दिवाणी दावा क्र.२९१/२०१५ मधील न्यायनिर्णय चुकीचा असल्याबाबत घोषणा होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जदारांचे अधिकचे कथन असे आहे की, ते प्रतिवादी क्र.१ चे पती व मुले आहेत. वाद मिळकतीमध्ये त्यांचा देखील गेल्या २५ ते ३० वर्षांपासून शांततामय व कायदेशीर ताबा आहे. ते कायदेशीर ताबेदार असल्याने दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. प्रतिवादी क्र.१ व त्यांचा वाद मिळकतीवर सामाईक ताबा व सामाईक मालकी देखील आहे. त्यामुळे, ते आवश्यक पक्ष असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा, अशी विनंती त्यांनी केली.

३. याउलट, वादीतर्फे सदरच्या अर्जाला आक्षेप घेवून विरोध दर्शविण्यात आला व असे कथन मांडण्यात आले की, प्रस्तुतचे अर्जदार हे दावा क्र.२९१/२०१५ मध्ये पक्ष नव्हते. तसेच, त्यांचा वाद मिळकतीशी काहीही संबंध नसल्याने ते दाव्यात आवश्यक पक्षकार नाहीत. तरी, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. दाव्यातील इतर पक्षांनी त्यांचे कथन न मांडल्याने दि.१०.१०.२०२४ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुतचा अर्ज पुढे चालविण्यात आला. अर्जाच्या संदर्भाने

संबंधित विव्दान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रकरणाची पाहणी केली असता प्रस्तुतचे प्रकरण हे घोषणेकरीता तसेच कायमस्वरुपी मनाई हुकूमाकरीता दाखल करण्यात आलेले आहे. त्या दाव्यातील म्हणजेच दिवाणी दावा क्र.२९१/२०१५ मधील न्यायनिर्णयाबाबत या दाव्यात मागणी करण्यात आलेली आहे. त्या दाव्यात प्रस्तुतचे अर्जदार हे पक्ष म्हणून समाविष्ट नव्हते, याबाबत दुमत नाही. प्रस्तुतचे अर्जदार हे जरी प्रतिवादी क्र.१ चे पत्नी व मुले असले, तरी त्यांनी त्यांचा दावा मिळकतीत स्वतंत्र हक्क, अधिकार व संबंध आहे हे दर्शविणारा कोणताही दस्त किंवा पुरावा या मितीला अभिलेखावर दाखल केलेला नाही. हेमराज भुरेवाल हे दाव्यात पक्षकार आहेत व त्यांचेच नातेवाईक प्रस्तुतचे अर्जदार आहेत. त्यामुळे, केवळ हेमराज याच्या कुटूंबातील सदस्य असल्याने अर्जदार यांना त्याच्या हयातीत स्वतंत्र हक्क व अधिकार प्राप्त होत नाहीत. प्रस्तुतच्या अर्जदारांविरुध्द दाव्यात कोणतेही कथन मांडण्यात आलेले नाही, तसेच प्रार्थना देखील करण्यात आलेली नाही. अशा परिस्थितीत, प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास इतरही प्रतिवादींचे नातेवाईक या आशयाचा अर्ज दाखल करतील व त्यामुळे अनावश्यक पक्षांचा समावेश दाव्यात होईल व गुंतागुंत वाढेल. अर्जदार यांचे स्वतंत्ररित्या कोणतेही हक्क, अधिकार व संबंध या मितीला आढळून येत नसल्याने ते दाव्यात आवश्यक पक्ष ठरत नाहीत. सबब, वर केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्रस्तुतच्या अर्जात फारसे तथ्य आढळून येत नसल्याने मी न्यायाच्या दृष्टीने या अर्जाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा खर्चासह नामंजूर करण्यात आला.

ANUP NANDKUMAR JAISWAL
Digitally signed by ANUP NANDKUMAR JAISWAL
Date: 2024.12.17 15:01:29 +0530

(अनुप नं. जयस्वाल)
सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
जालना.

दि.१६.१२.२०२४

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | वि.अ.ढोणे. |
| न्यायालयाचे नाव | – | सह दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना. |
| पी.डी.एफ. दिनांक | – | १७.१२.२०२४ |

स्वाक्षरीत/–

लघुलेखकाची स्वाक्षरी